दैनिक
# अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १३०
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, रविवार, दि.२२ डिसेंबर २०२४

"सुरवात करायची असेल तर
आजपासूनच करा,
उद्यापासून करू असं म्हंटल तर
तो उद्या कधीच येत नाही".

## पळशी आश्रम शाळेतील गैरप्रकाराचा मुद्दा विधानसभेत
### आ.काशिनाथ दातेंची विधानसभेत लक्षवेधी



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२१, पारनेर (अहिल्यानगर) :** पळशी ता. पारनेर येथील आश्रम शाळेतील गैरप्रकारची विधानभेत मांडणी करत दोषींवर कडक कारवाई करण्याची मागणी पारनेर-नगर मतदार संघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी केली आहे. नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात औचित्याच्या मुद्द्यावर चर्चा करताना पळशी आश्रम शाळेतील सुरु असलेला गैरप्रकार मांडला. यावेळी आ. दाते म्हणाले, ग्रामीण भागातील आदिवासी मुला-मुलींसाठी पळशी (ता.पारनेर) येथे निवासी आश्रम शाळा सुरू आहे. आश्रम शाळेत दोन-तीन दिवस पाणी येत नाही, आश्रम शाळेतील मुलांना फिल्टरचे पाणी मिळत नाही, मुलांना खाण्यासाठी आलेले केळी, बटाटा, वांगी, फ्लावर खराब झालेले उघडकीस आले आहे, पिण्याच्या पाण्याच्या हौदात किटक आढळले आहे. जेवणात एक्सपायरी झालेले पदार्थ वापरत असल्यामुळे मुला मुलींचे आरोग्य धोक्यात आले आहे. तसेच दहावीची परीक्षा दोन महिन्यावर आल्या असल्या तरी अद्याप गणित व इतर विषयाचे पाठ शिकवले जात नसल्याने निदर्शनास आले आहे. यामुळे आश्रम शाळेतील मुलांची गुणवत्ता ढासळली आहे. आश्रम शाळेच्या आवारात बाहेरचे पुरुष कामगार रहात आहे. तसेच सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याने मुलींच्या सुरक्षेतेचा मोठा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे आश्रम शाळेची चौकशी करून दोषींच्या विरोधात कडक कारवाई करण्यात यावी, तसेच मुला मुलींसाठी चांगल्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी आमदार काशिनाथ दाते यांनी विधानसभेत केली आहे.

**आश्रम शाळेत गैरप्रकार !**

आमदार दाते सरांनी पळशी आश्रम शाळेतील मुलींच्या सुरक्षेतेचा प्रश्न विधानसभेत घेऊन संवेदनशील नेता असल्याचे दाखवले, मी या आश्रम शाळेला भेट दिली होती. येथे अतिशय गैरप्रकार आहे, येथिल जेवण निकृष्ट दर्जाचे आहे. मुलींच्या वसतिगृहात महिला कर्मचारी नाही, येथिल माहिती बाहेर दिल्यास मुख्याध्यापिका त्रास देतात अशी माहिती मिळाली. मुलींच्या वसतिगृहासमोर बाहेरचे काम करणारे लोक राहतात ही अतिशय गंभीर बाब आहे.

**- सुषमा रावडे, तालुका अध्यक्षा, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी**

## अमित शहांच्या प्रतिमेस जोडे मारो आंदोलन




**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.२१, धाराशिव :** देशाचे गृहमंत्री भाजप नेते अमित शहा यांनी संसदेमध्ये बोलताना भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा अवमान होईल असे वक्तव्य केले आहे. याच्या निषेधार्थ नुकतेच महाविकास आघाडीच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुणीकृती पुतळ्या समोर अमित शहा यांच्या प्रतिमेस जोडे मारो आंदोलन करण्यात आले.

तसेच बीड येथील मयत सरपंच संतोष देशमुख व परभणी येथील मयत सोमनाथ सूर्यवंशी यांच्या हत्याकांडातील दोषींना तात्काळ फाशी देण्याची मागणी करण्यात आली. यावेळी तीव्र निदर्शने करत भाजप विरोधी घोषणा देण्यात आल्या. यापुढे कोणत्याही भाजपाच्या नेत्याने महापुरुषाविषयी अवमानास्पद वक्तव्य केल्यास महाराष्ट्रात फिरू देणार नाही असा इशाराही यावेळी आंदोलनकर्त्यांनी दिला.

यावेळी काँग्रेसचे जिल्हा संघटक राजाभाऊ शेरखाने, उपाध्यक्ष सय्यद खलील, उपाध्यक्ष प्रशांत पाटील, डिसीसी बँकेचे संचालक मेहबूब पाशा पटेल, काँग्रेसचे शहराध्यक्ष अग्निवेश शिंदे, नगर परिषद मा.गटनेते सिद्धार्थ बनसोडे, राष्ट्रवादी शहराध्यक्ष आयाज शेख

शिवसेना शहरप्रमुख सोमनाथ गुरव, जिल्हा सरचिटणीस अशोक बनसोडे, तालुकाध्यक्ष विनोद वीर, ओबीसी विभागाचे जिल्हाध्यक्ष धनंजय राऊत, सरचिटणीस जावेद काझी, नगरसेवक, रवि वाघमारे, राणा बनसोडे, अशोक पेठे, पंकज पाटील, प्रशांत साळुंके, पृथ्वीराज चिलवंत, शेखर घोडके, रणवीर इंगळे, महादेव माळी, अभिमान पेठे, प्रेम सपकाळ, विद्यार्थी काँग्रेसचे कफिल सय्यद, सुनील बडुरकर, युवक काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष धवलसिंह लावंड, गणेश असलेकर, बंडू आदरकर, सुरेश गवळी, अमित उंबरे, मनोज उंबरे सतीश लोंढे, सह्याद्री राजेनिंबाळकर, हर्षद ठवरे, शहाजी पवार, अंकुश चौगुले , राकेश कचरे, राकेश सूर्यवंशी, मुजीब काझी, साबेर सय्यद, अन्वर शेख, अक्षय खळदकर, संदीप गायकवाड, शहराध्यक्ष स्वप्नील शिंगाडे, संदीप शिंदे, महेंद्र शिंदे, अक्षय जोगदंड, नवज्योत शिंगाडे, शरीफ शेख यांचे सह महाविकास आघाडीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चला...आपापल्या फाईल तयार ठेवा ! खातेवाटप जाहीर झालंय !



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, मुंबई :** राज्यात महायुतीचं सरकार स्थापन झाल्यानंतर मंत्रिमंडळाचा विस्तार देखील पार पडला. त्यानंतर हिवाळी अधिवेशही झालं. मात्र, मंत्रिमंडळाचा विस्तार होऊन आठवडा झाला तरी खातेवाटप झालं नव्हतं. मात्र, अखेर आज राज्य मंत्रिमंडळाचं खातेवाटप जाहीर झालं आहे. यामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे गृहखातं असणार आहे, तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे नगरविकास तर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे अर्थखातं असणार आहे.

**कोणाला मिळालं कोणतं खातं?**

**देवेंद्र फडणवीस :** गृहखातं
**एकनाथ शिंदे :** नगरविकास आणि गृहनिर्माण
**अजित पवार :** अर्थ आणि राज्य उत्पादन शुल्क
**चंद्रशेखर बावनकुळे :** महसूल
**राधाकृष्ण विखे पाटील :** जलसंधारण
**हसन मुश्रीफ :** वैद्यकीय शिक्षण
**चंद्रकांत पाटील :** उच्च तंत्र शिक्षण
**गिरीश महाजन :** जलसंपदा
**गुलाबराव पाटील :** पाणीपुरवठा
**धनंजय मुंडे :** अन्न व नागरी पुरवठा
**दादाजी भुसे :** शालेय शिक्षण
**गणेश नाईक :** वनखातं
**संजय राठोड :** माती व पाणी परीक्षण खात
**मंगलप्रभात लोढा :** कौशल्य विकास
**उदय सामंत :** उद्योग व मराठी भाषा
**जयकुमार रावल :** विपणन
**पंकजा मुंडे :** पशुसंवर्धन आणि पर्यावरण
**अतुल सावे :** ओबीसी विकास, दुग्धविकास
**अशोक उईके :** आदिवासी विकास
**शंभूराज देसाई :** पर्यटन व खाण स्वातंत्र्य सैनिक कल्याण मंत्रालय
**आशिष शेलार :** माहिती व तंत्रज्ञान
**दत्तात्रय भरणे :** क्रीडा व अल्पसंख्याक विकास
**अदिती तटकरे :** महिला व बालविकास
**शिवेंद्रराजे भोसले :** सार्वजनिक बांधकाम
**माणिकराव कोकाटे :** कृषी
**नरहरी झिरवाळ :** अन्न व औषध प्रशासन
**जयकुमार गोरे :** ग्रामविकास आणि पंचायत राज
**संजय शिरसाट :** सामाजिक न्याय
**भरत गोगावले :** रोजगार हमी व फलोत्पादन
**नितेश राणे :** मत्स्य आणि बंदरे
**प्रताप सरनाईक :** वाहतूक
**बाबासाहेब पाटील :** सहकार
**मकरंद पाटील :** मदत व पुनर्वसन
**प्रकाश आबिटकर :** सार्वजनिक आरोग्य कुटुंब कल्याण

**राज्यमंत्री, कोणाकडे कोणतं खातं?**

**माधुरी मिसाळ :** सामाजिक न्याय, अल्पसंख्याक विकास वैद्यकीय शिक्षण
**आशिष जयस्वाल :** अर्थ आणि नियोजन आणि विधी व न्याय
**इंद्रनील नाईक :** उच्च आणि तंत्र शिक्षण आणि आदिवासी विकास
**मेघना बोर्डीकर :** सार्वजनिक आरोग्य, कुटुंब कल्याण
**योगेश कदम :** गृह राज्य शहर
**पंकज भोयर :** गृह निर्माण

## अनगर येथील अप्पर तहसील कार्यालय रद्द करा ; विधानभवनाबाहेर आ.खरेंचे अनोखे आंदोलन

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२१, मोहोळ :** मोहोळ तालुक्यातील अनगर येथे अप्पर तहसील कार्यालयास शासनाने मंजुरी दिली होती. या कार्यालयाचा मुद्दा विधानसभा निवडणुकीत चांगलाच चर्चेत आला होता. आमदार म्हणून मोहोळ मतदारसंघातील जनतेने निवडून दिल्यानंतर अनगर येथील अप्पर तहसिल कार्यालय रद्द करण्यासाठी आपण शासन स्तरावर प्रयत्न करणार असल्याचा

शब्द आ. राजाभाऊ खरे यांनी या भागातील जनतेला दिला होता. यामुळे जनतेनेही आ. खरेंच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून मोहोळ मतदारसंघातील कित्येक वर्षापासूनची मालकशाही उलथवुन आ.खरेंना मोठ्या मताधिक्याने विधानसभेत पाठविले. यामुळे आ. राजाभाऊ खरे यांनी नुकतेच नागपूर याठिकाणी सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशना दरम्यान सदर अप्पर तहसिल कार्यालय रद्द व्हावे यासाठी विधान भवन परिसरात काळा पोशाख परिधान केला




आणि अप्पर तहसील कार्यालय रद्द करा असा फलक हातात घेऊन अनोख्या आंदोलनाच्या माध्यमातून सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

या मोहोळ मतदारसंघाचे माजी आमदार राजन पाटील आणि यशवंत माने यांनी अनगर याठिकाणी अप्पर तहसील कार्यालय होणेकरीता प्रयत्न केले होते. मात्र अनगर येथील या तहसील कार्यालयास विरोध दर्शविण्यासाठी पाटील- माने विरोधकांनी एकत्र येत मोहोळ याठिकाणी निदर्शने करीत सर्वपक्षीय बैठकही घेतली होती. या बैठकीमध्ये मोहोळ तालुका बचाव समिती किंवा संघर्ष समिती अशा नावाने एक एकत्रितरित्या सर्वपक्षीय समिती स्थापन करण्यात आली. अनगर अप्पर तहसील कार्यालय मंजुरी रद्द करण्याच्या मागणीसाठी याठिकाणी मोहोळ बचाव संघर्ष समितीच्या वतीने राष्ट्रवादीचे माजी प्रदेश प्रवक्ते उमेश पाटील, चरण चवरे, विजयराज डोंगरे, दीपक गायकवाड, रमेश बारस्कर, मानाजी माने, पद्माकर देशमुख यांच्यासह अन्य नेते मंडळींनी अप्पर विरोधात मोठे रान उठवले होते. दरम्यान अनगर येथील अप्पर तहसील कार्यालयाला विरोध करत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे आमदार राजू खरे यांनी नुकतेच विधान भवन परिसरात काळे पोशाख व फलक घेऊन आंदोलन केल्याने त्यांच्या या अनोख्या आंदोलनाची जोरदार चर्चा मोहोळ मतदारसंघात होत आहे.

मोहोळ तालुक्यातील राष्ट्रवादी अजित पवार गटाचे वजनदार नेते माजी आमदार राजन पाटील अनगरकर यांच्या दबावात अनगर गावात दुय्यम निबंध कार्यालयासह नुकतेच अप्पर तहसील कार्यालयही मंजूर झाले. परंतु या कार्यालयास येथील ४० गावांचा विरोध आहे. यासाठी या ठिकाणी कडकडीत बंद हे केले गेले यासंदर्भात तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना साकडे घालून नवीन अप्पर तहसील कार्यालय रद्द करण्याची मागणी केली गेली. परंतु काही झाले नसल्याने हे आंदोलन करण्याची वेळ आली आहे. अनगर येथील अप्पर तहसील कार्यालय रद्द करावे यासाठी गेल्या वर्षभरापासून शासन दरबारी मागण्या, निवेदने, आंदोलने, उपोषणे झाली होती. या अप्पर कार्यालयात नरखेड पेनुर व शेटफळ या मंडलातील ४० गावी जोडलेली आहेत मात्र त्या गावांना अनगरला जाणे येणे अडचणीचे ठरत असल्याने या भागातील जनतेत असंतोष असुन मंजूर करण्यात आलेले सदर अप्पर तहसील कार्यालय त्वरीत रद्द करण्यात यावे.

**- आ.राजाभाऊ खरे मोहोळ विधानसभा**

## सिंदखेडराजा येथे अमित शहांचा पुतळा जाळला !

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, बुलडाणा :** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या वादग्रस्त विधान आणि परभणी येथील घटनेच्या निषेधार्थ सिंदखेडराजा येथे आज आंबेडकरी समाज एकवटला. आज शुक्रवारी, २० डिसेंबर रोजी दुपारी सिंदखेडराजा बस स्थानक परिसरात निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी आंदोलकांनी अमित शहांचा पुतळा जाळला.

यावेळी केंद्र व राज्य शासनाचा निषेध करणाऱ्या गगनभेदी घोषणा देण्यात आल्या. राष्ट्रमाता जिजाऊंच्या माहेर असलेल्या सिंदखेडराजा नगरीसह तालुक्यातील विविध आंबेडकरी संघटना, भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दलाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी झाले. यावेळी केंद्र शासनाच्या प्रतिकात्मक पुतळ्याला जोड्याने मारून पुतळ्याचे दहन करण्यात आले.

केंद्रीय गृह मंत्री अमित शहा यांनी संसदेमध्ये बोलताना आपल्या भाषणात घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव एकेरी भाषेत घेऊन अवमान केल्याचा आरोप या आंदोलकांनी केला.




याप्रकरणी त्यांच्याविरुद्ध 'अॅट्रोसिटी अॅक्ट' नुसार गुन्हा दाखल करावा. परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी यांच्या हत्येला जबाबदार असणाऱ्या पोलीस अधिकारी, कर्मचारी यांच्यावर मनुष्य वधाचा गुन्हा दाखल करावा, संविधान रक्षक सोमनाथ सूर्यवंशी यांच्या कुटुंबीयांना १ कोटी रुपयांची मदत देवून कुटुंबातील एका व्यक्तीस शासकीय सेवेमध्ये सामावून घेण्यात यावे, आदी मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आले.

यापूर्वी आज सिंदखेड राजा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा परिसरात सर्व आंबेडकरी समाजातील विविध पक्षातील पदाधिकारी कार्यकर्ते, भारतीय बौध्द महासभा, तसेच सामाजिक संघटनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते एकत्र जमले. बसस्टँड चौकात अमित शहा यांचा पुतळ्याचे दहन करण्यात आले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सर्व देशातील प्रत्येक नागरिकांचे रक्षक होते. त्यांचा अवमान म्हणजे सर्व देशाचा अवमान आहे. अमित शहा यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर साहेब व सर्व भारतीयांची माफी मागावी, त्यांच्याविरुद्ध देशद्राहाचा खटला दाखल करण्यात यावा. तसेच परभणी येथील पोलीस अधिकारी, कर्मचारी यांनी सोमनाथ सूर्यवंशी यांचा पोलीस कोठडीमध्ये अमानुष बेदम मारहाण केल्यामुळे त्यांचा मृत्यू झाला. याला जबाबदार पोलीस अधिकारी व कर्मचारी आहेत असे वैद्यकीय अहवालात सिध्द झाले आहे. त्यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा आदी मागण्यांचे निवेदन तहसीलदार सिंदखेड राजा यांना देण्यात आले.

यापूर्वी चिखली येथील डॉक्टर आंबेडकर यांच्या पुतळा परिसरात गुरुवारी संध्याकाळी जेलभरो आंदोलन करण्यात आले. यावेळी भूमी मुक्ती मोर्चाचे अध्यक्ष भाई प्रदीप अंभोरे यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांना पोलिसांनी स्थानबद्ध करून नंतर त्यांची सुटका केली.

## संपादकीय



### महाविद्यालयांची संकेतस्थळे जुनेच

महाविद्यालयांचे उत्तरदायित्व निश्चित व्हावे आणि विद्यार्थ्यांना इत्थंभूत माहिती मिळावी यासाठी, महाविद्यालयांची संकेतस्थळे अद्ययावत ठेवण्याच्या मार्गदर्शक सूचना यूजीसीने १० जून २०२४ रोजी दिल्या, मात्र सद्या:स्थिती काय आहे, महाविद्यालयांनी या दिशेने काही पावले उचलली का? पारदर्शकता हे मूलभूत उद्दिष्ट ठेवून सुरू झालेल्या 'नवीन शैक्षणिक धोरण २०२०'च्या मार्गात महाविद्यालयांची जुनाट संकेतस्थळे अडसर ठरत आहेत. उच्च शिक्षण संस्था समाजाला उत्तरदायी असल्याने शैक्षणिक संस्थांविषयी महत्त्वाची माहिती संकेतस्थळांवर प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. त्यांचे व्यवहार आणि हिशेब सार्वजनिक होणे गरजेचे आहे. हे उत्तरदायित्व अधिक बळकट करण्यासाठी महाविद्यालयांना आपली माहिती सार्वजनिक करावी लागणार आहे. दर्जेदार महाविद्यालयांचा विद्यार्थी शोध घेत असतो तेव्हा माहितीअभावी किंवा चुकीच्या माहितीमुळे त्याचा बराच वेळ वाया जातो. एकत्रित स्वरूपात सर्वंकष माहितीसाठी संकेतस्थळ महत्त्वाचे आहे. परंतु बहुतांश महाविद्यालयांची संकेतस्थळे अद्ययावत नसल्याने माहिती प्राप्त करताना अडचणी निर्माण होतात.

नवीन शैक्षणिक धोरणाने आता वेग घेतला असल्याने विद्यापीठ अनुदान आयोग (यूजीसी), दिल्ली कार्यालयाने १० जून २०२४ रोजी उच्च शिक्षण संस्थांसाठी महत्त्वाच्या मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या. महाविद्यालयांनी त्यांच्या संकेतस्थळांवर माहितीचे स्व-प्रकटीकरण प्रसिद्ध करावे, असे दिशानिर्देश देण्यात आले. सर्वांसाठी उपलब्ध असलेली माहिती उत्तरदायित्व विकसित करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचे पाऊल ठरेल, अशी विद्यापीठ अनुदान आयोगाची भूमिका आहे. आयोगाने अशा माहितीचे वर्गीकरण करून एक यादी प्रकाशित केली आहे. यामध्ये संस्थेविषयी, प्रशासन, शैक्षणिक, प्रवेश आणि शुल्क, संशोधन, विद्यार्थी जीवन, माजी विद्यार्थी, माहिती विभाग, प्रतिमा, संपर्क असे घटक समाविष्ट आहेत.

नॅक या मूल्यांकन संस्थेनेदेखील महाविद्यालयांचे संकेतस्थळ केवळ औपचारिकता ठरून चालणार नाही, तर ते कार्यरतदेखील असणे अनिवार्य असल्याचे म्हटले आहे, मात्र विद्यापीठ अनुदान आयोगाने मार्गदर्शक सूचना जारी करून सहा महिने उलटले असले तरी संकेतस्थळांची अवस्था जैसे थे आहे. 'संस्थेविषयी माहिती' या घटकाअंतर्गत ताळेबंद, उत्पन्न आणि खर्च, पावत्या आणि देयके यांसह लेखापरीक्षण अहवाल, इ. माहिती देणे अपेक्षित आहे. परंतु काही महाविद्यालयांना ही डोकेदुखी वाटते. संकेतस्थळांच्या माध्यमातून आर्थिक बाबीसमोर येणार असल्याने आर्थिक बेशिस्त, अनियमितता, भ्रष्टाचार, इ. कुप्रथांना लगाम लगू शकतो. यामुळे माहितीच्या अधिकाराअंतर्गत केल्या जाणाऱ्या अर्जांचे प्रमाणही वाढण्याची शक्यता आहे. म्हणून स्वप्रकटीकरणात टाळाटाळ होताना दिसते. यापूर्वीही नॅकने स्वयंमूल्यांकन अहवालात पाच वर्षांचे अंकेक्षण अहवाल समाविष्ट करणे बंधनकारक केले होते. परंतु अनेक महाविद्यालयांनी मूल्यांकनानंतर काही आठवड्यांत अंकेक्षण अहवाल संकेतस्थळांवरून काढून घेतले.

संकेतस्थळांवरून माहिती मिळवताना सहजता हा घटक परिणामकारक ठरतो. कुठल्याही अडथळ्याशिवाय, खाते न खोलता, नावनोंदणी न करता नागरिकांना माहिती सहजपणे प्राप्त करता यावी, असेही आयोगाने सुचवले आहे. त्यामुळे महाविद्यालयांना संकेतस्थळावर 'शोध' सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. शोध सुविधा संकेतस्थळावर उपलब्ध असल्यास आवश्यक त्या माहितीपर्यंत सहजपणे पोचता येते. त्यामुळे ५० टक्के वापरकर्ते संकेतस्थळावर अधिक काळ माहितीचा शोध घेणे पसंत करतात, असा 'शोध अनुभव' या अभ्यासाचा निष्कर्ष आहे. बहुतांश संकेतस्थळांवर 'शोध' सुविधा उपलब्ध नसल्याने माहिती सहजपणे उपलब्ध होत नाही.

'प्रशासन' घटकाअंतर्गत मुख्य सतर्कता अधिकारी आणि लोकपाल नेमणे आवश्यक आहे. तक्रारींचे निराकरण करण्याच्या दृष्टीने हे पाऊल महत्त्वाचे ठरेल. 'शैक्षणिक' घटकाअंतर्गत शैक्षणिक दिनदर्शिका हा घटक महत्त्वाचा आहे. या माध्यमातून वर्षभर प्रस्तावित उपक्रम, परीक्षांच्या तारखा, सुट्ट्यांचा कालावधी, अभ्यासक्रमपूरक आणि इतर उपक्रम, इ.ची माहिती मिळते. विद्यापीठ एक आराखडा संलग्नित महाविद्यालयांना उपलब्ध करून देते. त्याआधारे महाविद्यालयांना आवश्यक ते बदल करून आपली शैक्षणिक दिनदर्शिका तयार करून ती संकेतस्थळावर उपलब्ध करावी लागते.

# आाकडेमोडीचे गणिती बादशाह !

रामानुजन याचा शब्दशः अर्थ- रामाचा धाकटा भाऊ. त्यांचा जन्म दि.२२ डिसेंबर १८८७ रोजी सद्याच्या तामिळनाडूमधील इरोड येथील तमिळ ब्राह्मण अय्यंगार कुटुंबात झाला. त्यांचे वडील कुप्पुस्वामी श्रीनिवास अय्यंगार हे मूळचे तंजावर जिल्ह्यातील होते आणि ते एका साडीच्या दुकानात कारकून म्हणून काम करायचे.

त्यांच्या आई कोमलताम्मल या एक गृहिणी होत्या, ज्या तेथील स्थानिक मंदिरात गाणे गायच्या. हे कुटुंब कुंभकोणम शहरातील सारंगपानी सन्निधी रस्त्यावर एका छोट्याशा पारंपरिक घरात राहत होते. हे कौटुंबिक घर आता एक संग्रहालय आहे. रामानुजन दीड वर्षांचे असताना त्यांच्या आईने सदागोपन नावाच्या एका मुलाला जन्म दिला, जो तीन महिन्यांपेक्षा कमी कालावधीनंतर मरण पावला. डिसेंबर १८८९मध्ये रामानुजन यांना चेचक झाला, परंतु ते पुढे बरे झाले. तंजावर जिल्ह्यात या काळामध्ये ४ हजार लोक मरण पावले होते. ते त्यांच्या आईसोबत मद्रास आताचे चेन्नई जवळील कांचीपुरम येथे त्यांच्या पालकांच्या घरी गेले. त्यांच्या आईने १८९१ आणि १८९४मध्ये आणखी दोन मुलांना जन्म दिला, दोघेही त्यांच्या पहिल्या वाढदिवसापूर्वी मरण पावले. दि.१ ऑक्टोबर १८९२ रोजी रामानुजन यांनी स्थानिक शाळेत प्रवेश घेतला. त्यांच्या आजोबांनी कांचीपुरममधील न्यायालयीन अधिकारी म्हणून नोकरी गमावल्यानंतर रामानुजन आणि त्यांची आई कुंभकोणम येथे परत आले आणि त्यांनी कांगायन प्राथमिक शाळेत प्रवेश घेतला. जेव्हा त्यांचे आजोबा मरण पावले, तेव्हा त्यांना त्यांच्या आजी-आजोबांकडे परत पाठवण्यात आले, ते मद्रासमध्ये राहत होते. त्यांना मद्रासमधील शाळा आवडली नाही आणि त्यांनी शाळा टाळण्याचा प्रयत्न केला. ते शाळेत जात असल्याची खात्री करण्यासाठी त्यांच्या कुटुंबाने स्थानिक हवालदाराची भरती केली. सहा महिन्यांतच रामानुजन कुंभकोणमला परतले. रामानुजन यांचे वडील बहुतेक दिवस कामावर असल्याने त्यांच्या आईने मुलाची काळजी घेतली आणि त्यांच्यात घनिष्ठ संबंध होते. आईकडून ते परंपरा, पुराण, धार्मिक गाणी गाणे, मंदिरातील पूजेला उपस्थित राहणे आणि विशिष्ट खाण्याच्या सवयी वगैरे सर्व ब्राह्मण संस्कृतीचे भाग शिकले. कांगायन प्राथमिक शाळेत रामानुजनने चांगली कामगिरी केली. ते १० वर्षांचे होण्यापूर्वी नोव्हेंबर १८९७मध्ये त्यांनी इंग्रजी, तमिळ, भूगोल आणि अंकगणित या विषयांच्या प्राथमिक परीक्षा जिल्ह्यातील सर्वोत्तम गुणांसह उत्तीर्ण केल्या. त्याच वर्षी रामानुजन यांनी टाऊन हायर सेकेंडरी स्कूलमध्ये प्रवेश केला, जिथे त्यांना प्रथमच औपचारिक गणिताचा सामना करावा लागला.

रामानुजन यांनी सुरुवातीला स्वतःचे गणितीय संशोधन एकाकीपणे विकसित केले. हंस आयसेंकच्या मते, त्यांनी आपल्या कामात अग्रगण्य व्यावसायिक गणितज्ञांना रस घेण्याचा प्रयत्न केला, परंतु बहुतांश भाग अयशस्वी ठरला. त्यांना जे दाखवायचे होते ते खूप वैशिष्ट्यपूर्ण, खूप अपरिचित होते आणि असामान्य मार्गांनी सादर केले होते. आपले गणितीय कार्य अधिक चांगल्या प्रकारे समजू शकतील अशा गणितज्ञांच्या शोधात त्यांनी १९१३मध्ये इंग्लंडमधील केंब्रिज विद्यापीठात इंग्लिश गणितज्ञ जी.एच.हार्डी यांच्याशी पोस्टल पत्रव्यवहार सुरू केला. त्यांचे असाधारण कार्य ओळखून हार्डी यांनी रामानुजन यांना केंब्रिजला जाण्याची व्यवस्था केली. त्यांच्या नोट्समध्ये हार्डी यांनी टिप्पणी केली की रामानुजन यांनी नवीन प्रमेय निर्माण केले होते, ज्यामधील काहींनी माझा पूर्ण पराभव केला; मी त्यांच्यासारखे काही पूर्वी कधीही पाहिले नव्हते आणि काही अलीकडे सिद्ध झालेले पण अत्यंत प्रगत परिणाम देखील होते. त्यांनी आपल्या लहान आयुष्यामध्ये स्वतंत्रपणे सुमारे ३,९०० निकाल संकलित केले; ज्यामध्ये



**- संकलन व सुलेखन -**
**कृष्णकुमार निकोडे गुरूजी**
**रामनगर वॉर्ड, गडचिरोली.**
**फक्त व्हॉट्सअॅप- ९४२३७१४८८३.**

बहुतेक अविकारक- आयडेंटिटी आणि समीकरणे आहेत. यापैकी अनेक पूर्णतः नाविन्यपूर्ण होते; रामानुजन प्राइम, रामानुजन थीटा फंक्शन, विभाजन फॉर्म्युले आणि मॉक थीटा फंक्शन्स सारख्या त्यांच्या मूळ आणि अत्यंत अपारंपरिक परिणामांनी गणितामध्ये संपूर्ण नवीन क्षेत्रे उघडली आणि पुढील संशोधनासाठी मोठ्या प्रमाणावर प्रेरणा दिली. त्यांच्या हजारो निकालांपैकी एक डझन किंवा दोन सोडून सर्व आता बरोबर सिद्ध झाले आहेत. रामानुजन जर्नल, एक वैज्ञानिक नियतकालिक हे रामानुजन यांच्यावर प्रभाव असलेल्या गणिताच्या सर्व क्षेत्रांतील कार्य आणि प्रकाशित व अप्रकाशित परिणामांचा सारांश असलेल्या प्रकाशित करण्यासाठी स्थापन करण्यात आले होते. या सर्वांचे विश्लेषण आणि अभ्यास नवीन गणितीय कल्पनांचा स्रोत म्हणून त्यांच्या मृत्यूपासून अनेक दशकांपासून केला गेला आहे. सन २०१२च्या उत्तरार्धात संशोधकांनी काही निष्कर्षांसाठी साधे गुणधर्म आणि समान आउटपुट बद्दल त्यांच्या लिखाणातील केवळ टिप्पण्या शोधणे चालू ठेवले, ज्या स्वतःच गहन आणि सूक्ष्म संख्या सिद्धांत परिणाम होत्या आणि त्यांच्या मृत्यूनंतर जवळजवळ एक शतकापर्यंत संशयास्पद राहिल्या. रामानुजन हे रॉयल सोसायटीचे सर्वात तरुण फेलो बनले, जे फक्त दुसरे भारतीय सदस्य होते आणि ट्रिनिटी कॉलेज, केंब्रिजचे फेलो म्हणून निवडले जाणारे पहिले भारतीय बनले. रामानुजनची तुलना यूलर आणि जेकोबी सारख्या गणिती प्रतिभांशी करून हार्डी म्हणतात की, रामानुजन यांची मूळ पत्रे ही केवळ उच्च क्षमतेच्या गणितज्ञांनेच लिहिलेले असू शकतात हे दाखवण्यासाठी एकच नजर पुरेशी आहे. सन १९१९मध्ये अस्वास्थ्यामुळे रामानुजन यांना भारतात परतण्यास भाग पाडले. हा आजार आता हिपॅटिक अमिबियासिस- अनेक वर्षांपूर्वी आमांशाच्या गुंतागुंतीमुळे असल्याचे मानले जाते. जानेवारी १९२०मध्ये लिहिलेल्या हार्डी यांना लिहिलेल्या शेवटच्या पत्रांवरून असे दिसून येते की तेव्हादेखील ते नवीन गणिती कल्पना आणि प्रमेय तयार करत होते. त्यांच्या आयुष्याच्या शेवटच्या वर्षातील शोध असलेली त्यांची हरवलेली नोंदवही सन १९७६मध्ये पुन्हा सापडली तेव्हा गणितज्ञांमध्ये मोठी खळबळ उडाली.

एक प्रगाढ धार्मिक हिंदू असलेल्या रामानुजन यांनी आपल्या भरीव गणिती क्षमतेचे श्रेय देवत्वाला दिले. ते म्हणायचे की त्यांची कुळदेवी नामगिरी थायर यांनी त्यांचे गणितीय ज्ञान प्रकट केले. ते एकदा म्हणाले होते, देवाचा विचार व्यक्त केल्याशिवाय माझ्यासाठी समीकरणाला काही अर्थ नाही. अशा या जगप्रसिद्ध थोर शास्त्रज्ञाला ब्रिटिश भारतातील मद्रासमध्ये दि.२६ एप्रिल १९२० रोजी अल्पायुषात वयाच्या अवघ्या ३३व्या वर्षी देवाज्ञा झाली.

**!! महान गणितज्ञ श्रीनिवास रामानुजन अय्यंगार यांना त्यांच्या जयंती निमित्त सप्ताहभर विनम्र अभिवादन !!**

## अक्षराज कवीकट्टा

### आयुष्य मान..

अति महत्वकांक्षेला
सरळदाखव अस्मान
आकाश नको ठेंगणे
न्हावे लागेल भस्मानं

बंडखोरी दडपू टाका
घालेल उगाचं थैमान
कटूनिर्णय धाडसाचे
जोशात काढ फर्मान

सोसेल रूचेल तेवढा
गुपचुप करा अपमान
डोईवरून नको पाणी
कशास फुकटचामान

कायम ठेवावे सत्तेत
भले चांगले विद्यमान
कार्यकुशल निष्ठावान
योग्य साधे विद्या मान

भ्रष्टाचार शिंतोडेथोडे
वाकवेल तीर कमान
शुध्द चरित्र येता नेता
उंचवावी उंच कमान

स्थिर स्थावर निश्चित
धष्ट पुष्ट हवे यजमान
येतेलं अन् जातीलही
अस्थिर असे मेहमान

निष्ठेने करा जन सेवा
सत्ताहोई आयुष्यमान
मुश्कीले लाभे सुसंधी
जन भावनेचा सन्मान

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

## मानपाडा पोलीस ठाण्याच्या कार्यवाहीत बांगलादेशी नागरिकांवर गुन्हा दाखल

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि २०, डोंबिवली (ठाणे) :** मानपाडा पोलीस ठाण्याच्या पथकाने अनधिकृतरीत्या भारतात प्रवेश करून वास्तव्य करणाऱ्या पाच बांगलादेशी नागरिकांवर गंभीर गुन्हा दाखल केला आहे.

तक्रारदार राजेश दत्ताराम दाखिनकर (वय ४९) यांच्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. फिर्यादीनुसार, डोंबिवली पूर्वेतील दावडी भागात अनधिकृतपणे राहणाऱ्या बांगलादेशी नागरिकांकडे कोणतेही अधिकृत कागदपत्रे आढळून आली नाहीत.

गुन्ह्यात आरोपी पुढील प्रमाणे आहेत
१. बिशु हाजीमुददीन शेख (वय १९),
२. रूमान अब्दुलअजीस पोकीर (वय २५),
३. दिलवार अहमदअली हुसेन (वय २४),
४. आरिफ जहांगीर मुल्ला (वय २९),
५. आरिफ मोफिजुल शेख (वय ३५).




तपासादरम्यान, आरिफ मोफिजुल शेखने बांगलादेशी नागरिकांना भारतात बेकायदेशीरपणे राहण्यासाठी जागा मिळवून दिल्याचे उघड झाले आहे.आरोपींकडून चार मोबाईल फोन जप्त करण्यात आले. त्यातील सिमकार्ड क्रमांक आणि आयएमईआय क्रमांकांचे तपशील गुन्ह्यातील अधिक चौकशीसाठी वापरण्यात येत आहेत. सदर आरोपींनी भारत सरकारच्या नियमानुसार कोणतेही अधिकृत परवाने घेतले नव्हते. त्यांनी बेकायदेशीररीत्या देशात प्रवेश करून वास्तव्य केले होते.

सहाय्यक पोलीस निरीक्षक संपत फडोळ तपास करत आहेत. आरोपींना ताब्यात घेऊन पुढील कार्यवाही सुरू आहे.या प्रकरणामुळे स्थानिक रहिवाशांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. पोलीस प्रशासनाकडून सुरक्षेसाठी कठोर पावले उचलली जात आहेत.

## धोकेदायक ऊस वाहतूकीला शिस्त लावा !

उसाच्या ट्रॅक्टर ला धडकून अपघात झाला अशी बातमी हल्ली कोणत्या ना कोणत्या वर्तमानपत्रात वाचायला मिळतेच. यावर्षी अशा अपघातात जीवितहानी झाल्याची बातमी अद्याप वाचायला मिळाली नसली तरी या आधी अशा अपघातात अनेक जणांना जीव गमवावा लागला आहे. मागील वर्षी दौंडमध्ये झालेल्या अपघातात तीन तरुण मुलांना अशा अपघातात आपला जीव गमवावा लागला आहे. काष्टी तालुका श्रीगोंदा येथील पंचविशीतील तीन तरुणांची दुचाकी उसाच्या ट्रॅक्टरला धडकली कारण उसाच्या ट्रॅक्टरला रिफ्लेक्टर बसविण्यात आले नव्हते. रिफ्लेक्टर नसल्याने या तरुणांना उसाचा ट्रॅक्टर दिसला नाही त्यामुळे अपघात झाला आणि त्यात निष्पाप तरुणांना आपला जीव गमवावा लागला होता. सातत्याने असे अपघात होऊनही ऊस वाहतूकदारांना शिस्त लागत नाही. सध्या राज्यात ऊस वाहतूक जोरात सुरू आहे. अनेक कारखान्यांचा गाळप हंगाम सुरू आहे. राज्यातील प्रत्येक तालुक्यात दोन ते तीन कारखाने आहेत. त्यामुळे ऊस तोड करून उसाची वाहतूक जोमात सुरू आहे मात्र त्यामुळे क्षमतेपेक्षा अधिक ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांचा धोका वाढला आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने वाहनांच्या पाठीमागे किंवा बाजूला कोणत्याही उपाययोजना नसल्याने अपघाताचे प्रकार घडत आहेत. ऊस वाहतूक करताना क्षमतेपेक्षा अधिक उसाची वाहतूक केली जात आहे. ट्रॅक्टर चालक दोन ट्रॉली एकमेकांना जोडून ऊस वाहतूक करतात त्यामुळे समोरून येणाऱ्या वाहनांना फक्त ट्रॅक्टर दिसतो परंतु त्या ट्रॅक्टरच्या मागे असलेल्या ट्रॉलीवर कोणतेच इंडिकेटर नसल्याने फसगत होते. बऱ्याचदा वाहनांच्या एकदम जवळ गेल्यावर त्या ट्रॉली दिसतात मग घाई गडबडीत वाहन चालकांची अपघात रोखणयासाठी धांदल उडते. ऊस वाहतूक करणाऱ्या अनेक वाहनांना रिफ्लेक्टर, रेडियम तसेच टेल लॅम्प नसल्याने रात्री अनेक वाहन चालकांना पुढे ऊस वाहतूक करणारे वाहन आहे याचा अंदाज येत नाही त्यामुळेही अपघात होतात. ऊस वाहतूक करणारे वाहन चालक वाहन रस्त्याच्या मध्येच थांबवतात त्यामुळे अपघातांना आयतेच निमंत्रण मिळते. अनेक वाहन चालकांकडे वाहन चालवण्याचा परवाना नसतो. काही वाहनांवर तर चक्क अल्पवयीन चालक असतात. ऊस वाहतूक करणारे सर्वच चालक मोठ्या आवाजात स्पीकरवर गाणी लावतात त्यामुळे लक्ष तर विचलित होतेच पण ट्रॅक्टरच्या पाठीमागे काय घडले याचा वाहन चालकाला अंदाज देखील येत नाही. मोठ्या आवाजतील गाण्यांमुळे इतर वाहनांच्या हॉर्नचा आवाज वाहन चालकांना येत नाही. उसाची वाहतूक रात्रभर चालू असते आणि स्पीकर मोठमोठ्याने चालूच असल्याने रस्त्याच्या कडेवरील गावातील लोकांची झोपमोड होते. अंधारात बैल गाडीने देखील ऊस कारखान्यात नेला जाते. उसाने भरलेली बैलगाडी अंधारात जात असताना समोरून आणि पाठीमागून येणाऱ्या वाहनांना दिसत नाही त्यामुळे देखील अपघात होतात. यापुढे तरी ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे अपघात होऊ नये यासाठी आरटीओ प्रशासनाने ऊस वाहतूक करणाऱ्या सर्वच वाहनांसाठी नियमावली तयार करुन त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी यासाठी प्रयत्न करावेत म्हणजे धोकेदायकपणे सुरू असलेल्या या ऊस वाहतुकीला शिस्त लागेल आणि लोकांच्या जिविताशी चालणारा खेळ थांबेल.

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

# बेंबळी येथे आरोग्य शिबिरात २०५ जणांची तपासणी



**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.२१, धाराशिव :** महात्मा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत लाईफ केअर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्या वतीने तालुक्यातील बेंबळी येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. शिबिरात २०५ जणांची तपासणी करून गरजू रुग्णांना मोफत औषधे देण्यात आली. लाईफ केअर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात डॉ.कृष्णा स्वामी, डॉ.आकाश भाकरे, डॉ.सोहेल पूर्णा यांनी रुग्णांची तपासणी केली. शिबिरासाठी लाईफ केअर मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे संचालक अजीम शेख, अकबर पठाण, निलेश प्रधान व इतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# रा.जि.प.भोम शाळेचे तालुका स्तरीय क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश



**अक्षराज : संग्राम ठाकूर**

**दि.२१, उरण (रायगड) :** उरण पंचायत समिती शिक्षण विभाग यांच्या माध्यमातून उरण तालुकास्तरीय क्रीडा व व्यक्तिमत्त्व विकास स्पर्धा २०२४ आयोजित केल्या होत्या. या स्पर्धेत रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळा भोम शाळेतील विद्यार्त्यांनी घवघवीत यश संपादित केले असून यामध्ये कु.मनस्वी राकेश पाटील हिने लहान गटात दोरीवरील उड्या या स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवून भोम शाळेचे व गावाचे नाव उज्वल केले आहे. तसेच कु.मनस्वी पाटील हिला मिळालेल्या यशामुळे यापुढे ही मुलगी आपल्या उरण तालुक्याचे नेतृत्व जिल्हा स्तरावर करणार आहे. ही उरण तालुक्यासाठी मोठी अभिमानाची बाब ठरली आहे. तसेच लहान गटात लगोरीमध्ये भोम शाळेतून कु.साई संकेत पाटील, कु.हरीसिंग लालसिंग आदिवासी, कु.सुधान्शु रामू राज या विद्यार्थ्यांची प्रथम क्रमांक मिळवला असून यांची सुद्धा जिल्हा स्तरावर निवड झाली आहे. यासाठी शाळेच्या मुख्याध्यापिका सुनीता संपत येडगे व शाळेचे प्रशिक्षक शिक्षक नामदेव बुधाजी बरतोड यांचे प्रशिक्षण व सहकार्य लाभले असून यांच्या मागे केंद्रप्रमुख अविनाश नवाळे यांचे मोठे मोलाचे योगदान लाभले आहे. रा.जि.प भोम शाळेच्या मुख्याध्यापिका सुनीता येडगे म्हणाल्या की, माझ्या शाळेतील विद्यार्थी हा जिल्हा पातळीवर खेळायला जात आहे. ही खूप आनंदाची बाब असून यापुढे ते राज्य व देश पातळीवर खेळण्यासाठी कसे तयार होतील. यासाठी आम्ही प्रयत्नशील असू, भोम गावातील शिक्षक सेनेचे बबन पाटील गुरुजी, काँग्रेस पक्षाचे नेते घनश्याम पाटील, किशोर केणी माजी सरपंच शेखर केणी व तुषार पाटील, मनोज ठाकूर, शेकाप चे प्रदीप पाटील, शाळा कमिटीचे माजी अध्यक्ष हरेश पाटील यांनी सर्व विध्यार्थी यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# महाराष्ट्र योगशिक्षक संघ मुंबई जिल्ह्यातर्फे १०८ सूर्यनमस्कारचे आयोजन

**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.२१, मुंबई :** येणाऱ्या २०२५ या नवीन वर्षात मकरसंक्राती निमित्त शास्त्रशुद्ध पद्धतीने सूर्यनमस्काराने सूर्याची उपासना घडावी. तसेच भारतीय प्राचीन ऋषीमुनींच्या योग सिद्धांतावर आधारित योग ज्ञानाचा प्रचार आणि प्रसार व्हावा म्हणून १२ अंकांचा एक सूर्यनमस्कार याप्रमाणे १०८ सूर्यनमस्कार साधना करुन घेण्यासाठी रविवार, दिनांक १९ जानेवारी २०२५ रोजी महाराष्ट्र योगशिक्षक संघ मुंबई जिल्हा तर्फे राज्यस्तरीय सामूहिक १०८ सूर्यनमस्कार शिबीर गोरेगाव पश्चिम येथील व्हीनस कल्चर असोसिएशन गार्डनमध्ये सकाळी ७ वाजता आयोजित करण्यात आले आहे. मुंबई-महाराष्ट्रातील सर्व आदरणीय योगसाधक, योगप्रेमी व योगशिक्षकांनी नाममात्र २०० रु शुल्क भरून रजिस्ट्रेशन करावे असे आवाहन महाराष्ट्र योगशिक्षक संघ मुंबई जिल्ह्याचे अध्यक्ष संतोष खरटमोल यांनी केले आहे.

# यमदूत उतरले डोंबिवली रेल्वे स्थानकावर

## आर.पी.एफ / लोहमार्ग पोलिसांचे अनोखी उपक्रम



**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.२१, डोंबिवली (ठाणे) :** डोंबिवली मध्ये शनिवार, दिनांक २१ डिसेंबर २०२४ रोजी आर.पी.एफ, लोहमार्ग पोलिसांचे अनोखी उपक्रम दिसून आले. या कार्यक्रमांमध्ये लोहमार्ग पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक किरण उंदरे, सह पोलीस निरीक्षक धनराज जारवाला आणि आर,पी,एफ डोंबिवली चे प्रभारी निरीक्षक गजेंद्र राऊत उपनिरीक्षक सुहास मनोहर आणि ठाणे मधील अंमलदारांनी सोबत डोंबिवली स्थानकात रेल्वेने होणारे अपघात कमी (झिरो एक्सीडेंट) करण्याकरिता मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेत लाईन क्रॉसिंग, चालत्या गाडी पकडणे व उतरणे असे जनजागृतीसाठी प्रतीकात्मक पद नाट्य द्वारे जनजागृती करण्यात आली. या जनजागृती मध्ये प्रवासांनी चालती ट्रेन पकडू व उतरू नये. त्याचबरोबर लोकलचे बाहेर फुट बोर्डवर लटकून नये असे मेगा फोन द्वारे मराठी हिंदी व इंग्रजी भाषेत आव्हान करण्यात आले. ही मोहीम लोहमार्ग पोलीस ठाणे आणि आरपीएफ संयुक्त पणे राबवण्यात आली.

# छगन भुजबळ यांना कॅबिनेट मंत्रीपद द्या

## समता परिषदेंचे खोत यांची उपमुख्यमंत्री पवार यांच्याकडे मागणी



**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.२१, धाराशिव :** ओबीसी व तमाम मागासवर्गीयांचे दैवत छगनराव भुजबळ यांना कॅबिनेट मंत्रीपद देण्यात यावे. अशी मागणी समता परिषदेचे मराठवाडा अध्यक्ष यांच्यासह त्यांच्या कार्यकर्त्यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली आहे.

समता परिषदेच्या वतीने दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, ओबीसी व तमाम मागासवर्गीयांचे दैवत छगन भुजबळ यांच्या आदेशानुसार महाराष्ट्रातील सर्व ओबीसी घटकाने एकत्रित येऊन महायुती सरकार स्थापन करण्यात आले. परंतु छगन भुजबळ यांना मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले नाही. त्यामुळे महाराष्ट्रातील मागासवर्गीय जनता नाराज आहे. भुजबळ यांनी अजित पवार गट झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट वाढवण्यासाठी निरंतर प्रयत्न केले आहेत. त्यामुळे महाराष्ट्रातील ओबीसी समाज व इतर मागासवर्गीय समाजाने राष्ट्रवादी अजित पवार गटाला तसेच महायुतीला मतदानाची एकहाती मदत केल्यामुळे महायुती सरकार स्थापन झाले. त्यामुळे वरील सर्व बाबींचा विचार करून छगनराव भुजबळ यांना कॅबिनेट मंत्रीपद देण्यात यावे जेणेकरून ओबीसी समाज व इतर मागासवर्गीय समाजाची नाराजी कमी होईल असे निवेदनात म्हटले आहे. यावेळी समता परिषदेचे मराठवाडा अध्यक्ष आबा खोत, धाराशिव जिल्हाध्यक्ष बिभीषण खुणे, रॉबीन बगाडे, व्यंकट जाधव, श्रावण गंगणे, लखन वायकुळे, ज्योतीराम अलबत्ते, मुदसर पटेल, नंदकुमार कुऱ्हाडे, अक्षय थोरात, शहारुख शेख. एच. डी. भालेराव, बाळू देवकर, हसन शेख, अमीत बगाडे, प्रशांत वेदपाठक, शशिकांत महामुनी, दत्तात्रय अंधारे आदी उपस्थित होते.

# शहरातील वाहतूक समस्येबाबत महापालिका प्रशासक, आयुक्त यांच्या दालनात बैठक



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२०, उल्हासनगर (ठाणे) :** उल्हासनगर शहरातील वाहतूक समस्येबाबत चर्चा करणेसाठी मा.महापालिका प्रशासक तथा आयुक्त विकास ढाकणे यांनी त्यांचे दालनात दिनांक २० डिसेंबर रोजी बैठक आयोजित केली होती. सदर बैठकीत पुढील विषयांवर चर्चा करुन कार्यवाहांची दिशा ठरविण्यात आली. शहरातील मुख्य रस्ते व चौक येथील अनधिकृत रिक्षा धांब्यांवर कारवाई करणे,रिक्षा थांबे व रिक्षांची संख्या निश्चित करणे याकरिता वाहतूक पोलीस, पोलीस व महानगरपालिका अधिकारी यांची समिती गठीत करणेबाबत कार्यवाही करावी. सदर समितीची बैठक दर आठवड्यास घेवून पुढील कार्यवाहोचो दिशा ठरविण्यात येईल. सदर मोहिमेच्या जनजागृतीसाठी शहरात होडोंग्स, चित्रफिती प्रदर्शित करण्यात येणार आहे. शहरातील मुख्य रस्त्यांवर पिवळे व पांढरे पट्टे मारणे, रस्त्यांवर नो पाकोंग, P1. P2 चे फलक लावणे, अवजड वाहनांच्या वाहतुकीसाठी वेळ निश्चित करणेकरिता गठीत केलेल्या समितीने पाहणी करण्यात येवून यानंतर संयुक्त मोहिम दिनांक ०१ जानेवारी, २०२५ नंतर हाती घेवून नियमांचे उल्लंघन करणा-यांवर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे. शहरात सुरु असणारी विकास कामे उदा.रस्त्यांची कामे, भुयारी गटार योजनेची कामे या ठिकाणी सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून उपाययोजना करणे. बॅरिकेटीग, सुरक्षा पट्टा लावणेबाबत कार्यवाही करावी. तशा सूचना संबंधित ठेकेदारांना देण्यात आल्या आहेत. परिवहन सेवेच्या थांब्यांवर येथे रिक्षा उभ्या राहत असल्याने त्यांचेवर कारवाई करणेत येणार असून,मॅरेज हॉल, मोठे हॉटेल्स यांचे बाहेर होणा-या बेकायदा पार्कांगवर कारवाई करण्यात येणार आहे.गर्दीच्या वेळेस मुख्य रस्ते,चौक या ठिकाणी वाहतूक सुरळीत व्हावी यासाठी ट्रॅफिक वॉर्डन ठेवण्यात येणार आहेत.

शहरातील वाहतूक कोंडी होणारे रस्ते/चौक (BOTTLENECK POINTS) व शहरातील अपघातप्रवण क्षेत्र (BLACK SPOTS) ची महानगरपालिकेने यादी तयार केली असून तो वाहतूक शाखा यांच्या सल्याने त्या ठिकाणी आवश्यक कारवाई करणेत येणार आहे.

शहरातील ५ आदर्श रस्ते खालीलप्रमाणे करावयाची कार्यवाही महानगरपालिकेकडून सुरु आहे.

१. कल्याण अंबरनाथ रोड ३ कि.मी.
२. डॉल्फीन रोड :- १ कि.मी.
३. व्ही.टी.सी. रस्ता २ कि.मी.
४. मुरबाड रोड :- १.६८ कि.मी.
५. श्रीराम चौक ते १७ सेक्शन रस्ता ०.७८ कि.मी.

रस्त्यावरील अतिक्रमण हटविणे,दुभाजक बांधणे, लाइटिंग करणे, रोड लेन, झेब्रा क्रॉसिंग मार्किंग करणे, वाहतुकोशो निगडीत चिन्हे /माहिती फलक लावणे, रस्त्यांवरील खड्डे बुजवणे.वृक्षारोपण करणे,

वरील प्रमाणे कार्यवाही महानगरपालिकेकडून पुढील ३ महिन्यात करण्यात येणार आहे, असे सांगितले.

सदर बैठकीस उल्हासनगर विधानसभा सदस्य कुमार आयलानी, वाहतूक शाखा ठाणेचे पोलीस उप-आयुक्त पंकज शिरसाट,परिमंडळ ४ चे पोलीस उप-आयुक्त सचिन गोरे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त (२) किशोर गवस, वाहतूक शाखेचे सहायक पोलीस आयुक्त विजय पोवार, वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक अविनाश भामरे, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक सुखदेव पाटील, कल्याणचे मोटार वाहन निरिक्षक-उप प्रादेशिक परिवहन अधिकारो बालाजी बोंदरवाड व महानगरपालिकेतील सर्व प्रभाग समितीचे सहायक आयुक्त उपस्थित होते.

# विधानसभेची निवडणूक लढले; आता खर्च सादर करा

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२१, अहिल्यानगर :** विधानसभा निवडणूक लढविणार्या उमेदवारांना अंतिम खर्चाचा हिशोब द्यावा लागणार आहे. उमेदवारांना खर्च सादर करण्यासाठी दिनांक २३ डिसेंबर २०२४ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. दरम्यान, खर्च तपासणीस गुरूवारपासून सुरूवात झाली आहे. त्यासाठी नियुक्त केलेले केंद्रिय निवडणूक आयोगाचे निवडणूक खर्च निरीक्षक देवांशी विश्वास, अरूण चौधरी आणि जयंतकुमार हे अहिल्यानगरमध्ये दाखल झाले आहेत. निवडणूक आयोगाने विधानसभा निवडणूक खर्चासाठी ४० लाखांची मर्यादा दिली होती. जिल्ह्यातील १२ विधानसभा मतदारसंघांतून १५१ उमेदवार निवडणुकीत होते. उमेदवारांनी अर्ज दाखल केलेल्या तारखेपासूनच खर्चाच्या सर्व नोंदी ठेवणे बंधनकारक होते. उमेदवारांना खर्चाच्या नोंदीसाठी एक स्वतंत्र बँक खाते उघडावे लागले. या खात्यातूनच खर्च करावा लागत होता. उमेदवाराने आयोजित केलेल्या मिरवणुका, प्रचार सभा या कार्यक्रमांचे आयोगाच्या वतीने चित्रीकरण केले जात होते. प्रचार सभेसाठी किती खुर्च्या आहेत ? व्यासपीठ, हार, टोप्या, पंच आदी बाबींचे चित्रीकरण केले जात होते. आयोगाने दर निश्चित केलेल्या दरापेक्षा कमी दर एखाद्या उमेदवाराने दाखविल्यास तो खर्च निवडणूक निरीक्षक मान्य करत नव्हते. पहिल्याच टप्प्यात अनेक उमेदवारांच्या खर्चामध्ये तफावत आढळून आली होती.

दरम्यान, आतापर्यंत दोन वेळा खर्चाची पडताळणी झालेली आहे. विधानसभा निवडणूक निकालानंतर एक महिन्याच्या आतमध्ये अंतिम खर्च सादर करणे बंधनकारक आहे. खर्च सादर न केल्यास संबंधित उमेदवारास सहा वर्षांसाठी निवडणूक लढविण्यास प्रतिबंध करण्याची तरतूद आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य वित्त व लेखाधिकारी तथा निवडणूक खर्च नोडल शैलेश मोरे यांच्या नेतृत्वाखाली सहायक नोडल अधिकारी सचिन धस, राजू लाकूडझोडे, जे. एम. सहारे, बाबासाहेब घोरपडे, योगेश झांबरे, महेश कावरे, सुरेंद्र पवार, गणेश खेडकर, अतुल कुलकर्णी, रोहन मरकड, संजय आगलावे यांचे पथक खर्चाची पडताळणी करत आहे.

# सायन पनवेल रोडवर कळंबोली एक्सप्रेस हायवेजवळ कारचा अपघात



**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.२१, कळंबोली (नवी मुंबई) :** सायन पनवेल रोडवर दिनांक २१ डिसेंबर रोजी सकाळी कळंबोली सर्कलच्या अगोदर मुंबईहून - पुण्याकडे जाणाऱ्या रोडवर, यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गाला सुरुवात होण्याच्या अगोदर असणाऱ्या, कळंबोली हायवे येथील मॅकडोनाल्ड बस स्टॉप जवळ सकाळी साडेअकरा वाजताच्या सुमारास एक अपघात झाला. पुण्याच्या दिशेने जात असलेल्या एका कारने अचानक ब्रेक लावल्यामुळे मागून येणाऱ्या दुसऱ्या कारने त्या गाडीला धडक दिली. अचानक घडलेल्या या अपघातात मागून येणारी शिवनेरी एसटी बस दुसऱ्या कारवर आदळली. अशाप्रकारे ३ गाड्यांचा एकत्रित एक्सीडेंट झाला. सुदैवाने या अपघातात कोणतीही जीवित हानी झालेली नाही. शिवाय कोणत्याही व्यक्तीला मोठी इजा झालेली नाही.

# वैनगंगा-नळगंगा नदी जोड प्रकल्प ७ वर्षात पूर्ण करणार : मुख्यमंत्री

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२१, नागपूर :** गोसेखुर्द राष्ट्रीय सिंचन प्रकल्पातून वाहून जाणाऱ्या पाण्याचा उपयोग करून पश्चिम विदर्भाला दुष्काळमुक्त करण्यासाठीचा महत्वाकांशी प्रकल्प वैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प येत्या ७ वर्षांत पूर्ण करण्यात येईल, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज विधानसभेत दिले.विरोधीपक्षाच्या अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला फडणवीस यांनी उत्तर दिले. ते म्हणाले, विदर्भ, मराठवाड्यातील सिंचन प्रकल्प, औद्योगिक प्रकल्प पूर्णत्वाला नेणार असून मराठवाड्यातील वॉटरग्रीट प्रकल्प मार्गी लावणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. गडचिरोली स्टील सिटी म्हणून उदयास येत असून येत्या तीन वर्षात गडचिरोलीतील नक्षलवाद आटोक्यात आणणार असल्याचे त्यांनी सांगितले.

विदर्भातील सिंचनाचे क्षेत्र वाढविण्यासाठी वैनगंगा-नळगंगा नदी जोड प्रकल्प येत्या सात वर्षात मार्गी लावणार आहे.

परंतु या प्रकल्पाचा लाभ काही जिल्ह्यांना ३ वर्षांपासून होणार आहे. हा प्रकल्प ८८ हजार कोटींच्या असून १० लाख एकर जमीन सिंचनाखाली येणार आहे. या प्रकल्पामुळे आम्ही ५५० किलो मीटर लांबीची नवीन नदीच तयार करणार आहोत. मुबलक पाण्यामुळे विदर्भाच्या औद्योगिक विकासालाही गती मिळेल. विदर्भ, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातील प्रकल्पांसाठी बळीराजा योजनेमुळे सिंचन क्षेत्र वाढणार आहे.नाग नदी सुधाराला मान्यता मिळाली आहे. नाग-पोहरा-पिवळी नदी असा प्रकल्प असून सांडपाणी या नद्यांमध्ये जाऊ नये यासाठी प्रयत्न सुरू आहेत. कन्हान नदी वळण योजनेला मंजूरी दिली असून ३२०० एकर जमीन सिंचनाखाली येणार आहे.

# कांद्यावरील २० टक्के निर्यात शुल्क हटवा

## खा.निलेश लंके यांची पियुष गोयल, जितिन प्रसाद यांच्याकडे मागणी



शेतकऱ्यांना दिलासा द्या कांदा उत्पादकांचे हित लक्षात घेऊन केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यातीवर लावलेले २० टक्के निर्यात शुल्क हटवावे. जेणेकरून शेतकऱ्यांना दिलासा मिळू शकेल आणि त्यांचा झालेल्या नुकसानीची भरपाई होऊ शकेल.

– खासदार निलेश लंके

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२०, अहिल्यानगर :** देशांतर्गत बाजारपेठेत कांद्याचे भाव कोसळल्याने शेतकरी वर्ग हवालदिल झाला असून शेतकरी बांधवांना दिलासा देण्यासाठी केंद्र सरकारने कांद्याच्या निर्यातीवर लावलेले २० टक्के निर्यात शुल्क तात्काळ हटविण्याची मागणी खा.नीलेश लंके यांनी वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल, राज्यमंत्री जितिन प्रसाद यांची भेट घेउन केली.

खासदार सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली मंत्री पियुष गोयल यांना भेटलेल्या शिष्टमंडळात खासदार नीलेश लंके, बजरंग सोनवणे, खा.शोभा बच्छाव, खा.राजाभाऊ वाझे, खा.गोवाल पाडवी, खा.वर्षा गायकवाड, खा.भास्कर भगरे, खा.मारूतीराव कोवासे यांचा समावेश होता. खा.निलेश लंके यांनी गोयल यांच्याशी संवाद साधत महाराष्ट्रातील कांदा उत्पादन तसेच भाव कोसळल्याने शेतकऱ्यांवर ओढावलेल्या संकटाबाबत चर्चा केली. खासदार लंके यांनी गोयल यांना निवेदन सादर केले असून त्यात नमुद करण्यात आले आहे की, महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादनात अग्रेसर आहे. महाराष्ट्रातील कांद्याला विदेशात मागणी असल्याने परदेशात मोठया प्रमाणावर महाराष्ट्रातील कांद्याची निर्यात केली जाते.

कांदा उत्पादक शेतकऱ्यांना उत्पादन खर्चावर आधारीत भाव मिळत नाही. अगोदरच कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या कांद्याला उत्पादन खर्चापेक्षाही कमी भाव मिळत आहे. असे असताना भारत सरकारने कांद्याच्या निर्यातीवर २० टक्के निर्यात शुल्क लावले आहे. त्यामुळे कांदा उत्पादकांना मोठे नुकसान सोसावे लागत आहे. या शुल्कामुळे कांद्याच्या निर्यातीवर ही परिणाम होत असल्याचे खा. लंके यांनी या निवेदनात नमुद केले आहे.

महाराष्ट्रामध्ये उन्हाळी कांद्याचा साठा संपला असून राज्यातील विविध बाजार समित्यांमध्ये लाल कांद्याची आवक होत आहे. गेल्या काही दिवसांमध्ये बाजार समित्यांमध्ये कांद्याची मोठ्या प्रमाणावर आवक झाल्याने शेतकऱ्यांना दुहेरी मनस्ताप सहन करावा लागतो आहे. अगोदरच अवकाळी पाऊस, बदलते हवामान यामुळे कांदा उत्पादनात आणि उत्पन्नात घट आली आहे. तर दुसरीकडे त्यांना त्यांचा कांदा कमी दरात विकावा लागत असल्याचे खा. लंके यांनी मंत्री पियुष गोयल यांच्या निदर्शनास आणून दिले आहे.

# थोडक्यात

## अवैध वाळू वाहतुकीवर महसूल प्रशासनाची कारवाई

### २ टिपर व एक पिक अप जीप जप्त



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.२०, पंढरपूर :** अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूकी विरोधात पंढरपूरच्या महसूल विभागाने धडक मोहीम हाती घेतली आहे. तालुक्यात महसूल विभागाच्या भरारी पथकाव्दारे गोपाळपूर (ता.पंढरपूर) येथील भीमा नदीपात्रात अवैध वाळू उत्खनन व वाहतुक करण्यासाठी वापरण्यात येणारे २ टिपर व एक पिक अप जीप अशी ३ वाहने जप्त करण्यात आली असल्याची माहिती तहसिलदार सचिन लंगुटे यांनी दिली. पंढरपूर तालुक्यातील अवैध गौण खनिज उत्खनन रोखण्यासह वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्यांच्या विरोधात कारवाई करण्यासाठी प्रांताधिकारी सचिन इतापे व तहसिलदार सचिन लंगुटे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. दिनांक १९ डिसेंबर २०२४ रोजी गोपाळपूर येथील भीमा नदी पात्रात अवैध वाळू वाहतूक करण्यासाठी वापरण्यात येणारे २ टिपर व एक पिक अप जीप अशी ३ वाहने जप्त करण्यात आली असून सदर वाहने शासकीय धान्य गोदाम पंढरपूर येथे लावण्यात आली आहेत. या भरारी पथकात मंडळ अधिकारी विजय शिवशरण, राजेंद्र वाघमारे, पंकज राठोड, ग्राम महसूल अधिकारी साईनाथ अडगडाळे, पियुष भोसले, प्रमोद खंडागळे, महेश सावंत, गणेश पिसे, संजय खंडागळे, समीर पटेल, मंगेश बनसोडे, रविकिरण लोखंडे, पी.पी.कोईगडे, आर.बी खंदारे व पंढरपूर तालुका ग्रामीण पोलीस ठाणे अधिकारी सहभागी होते.

## राज्यस्तरीय रस्सीखेच स्पर्धेत नागपूर जिल्ह्याच्या दोन्हीही संघास सुवर्ण पदक




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२१, नागपूर :** महाराष्ट्र टग ऑफ वार असोसिएशन व पालघर जिल्हा टग ऑफ वार असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने नुकत्याच गावदेवी मैदान, चिंचणी, जिल्हा पालघर येथे संपन्न झालेल्या राज्यस्तरीय सीनियर रस्सीखेच स्पर्धेमध्ये नागपूर जिल्ह्याच्या दोन रस्सीखेच संघाने सहभाग घेऊन दोन्हीही संघाने उल्लेखनीय कामगिरी करून स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त करून सुवर्ण पदक प्राप्त केले.

या स्पर्धेत सिनियर मुले ६२० किलो आत वजन गटात नागपूर जिल्हा संघाने साखळी सामन्यात संभाजी नगर, ठाणे जिल्हा संघावर २–० ने विजय मिळवून, ऊपांत्य फेरीत अहिल्यानगर संघावर २–० विजय मिळवून अंतिम फेरीत प्रवेश केला व अंतिम सामन्यात नांदेड जिल्हा संघावर २–० ने विजय मिळवून सुवर्ण पदक प्राप्त केले.

**प्रथम क्रमांक प्राप्त करणारा नागपूर जिल्ह्याचा संघ –**

शुभम भोकरे (कर्णधार) प्रज्वल शिंदूरकर, पियुष भोकरे, हर्षल माहुले,उज्जैर शेख, हर्ष चौरे, समीर शेख, स्वरित गौरखेडे, अभिषेक चवरे, विराज मेहर

प्रशिक्षक– धैर्यशील सुटे

त्याचप्रमाणे सिनियर पुरुष व महिला मिक्स ६०० किलो आत वजनगटात साखळी सामन्यात कोल्हापूर संघावर २–० ने विजय मिळवून, उपांत्य फेरीत ठाणे जिल्हा संघावर २–० ने विजय मिळवून अंतिम फेरीत प्रवेश केला. व अंतिम सामन्यात मुंबई संघावर २–० ने दणदणीत विजय मिळवून सुवर्णपदक प्राप्त केले.

**प्रथम क्रमांक प्राप्त करणारा नागपूर जिल्ह्याचा संघ –**

रिया करवाडे(कर्णधार), सिद्धी गुरव, जानवी बावकर, प्रांजली चौधरी, पियूष भोकरे, प्रज्वल शिंदूरकर, उज्जैर शेख, गोपीनाथ ढवळे, तन्वी चव्हाण, सागर राऊत

प्रशिक्षक – आदर्श पाटील

दि टग ऑफ वॉर असोसिएशनचे अध्यक्ष व माजी मंत्री सुनील केदार, महाराष्ट्र टग ऑफ वॉर असोसिएशनच्या अध्यक्षा माधवी पाटील, उपाध्यक्ष, सुहास आहेर, सचिव जे.ई. गुपिले, नागपूर रस्सीखेच संघटनेचे सचिव धैर्यशील सुटे, बबलू सोनटक्के, राजकुमार परिहार, आशिष उपासे, प्रभाकर क्षिरसागर, किशोर पाटील यांनी प्राविण्यप्राप्त खेळाडूंचे अभिनंदन.

## अंजुमन स्कूल येथे भारतीय भाषा उत्सव दिन साजरा



**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.२०, महाबळेश्वर (सातारा) :** अंजुमन खैरुल इस्लाम उर्दू हायस्कूल व ज्यु.कॉलेज महाबळेश्वरमध्ये विविध उपक्रम आयोजित करण्यात आले. भाषेच्या माध्यमातून एकता दर्शवण्यासाठी तसेच अनेक भाषेबद्दल अभिमान आणि कौतुक भावना वाढवण्याचे दृष्टिकोन विकसित करण्यावर भर देण्यासाठी अंजुमन उर्दू हायस्कूल व ज्यु कॉलेज महाबळेश्वर येथे दिनांक २० डिसेंबर २०२४ रोजी ३५ विद्यार्थ्यांनी भारतीय विविध वेशभूषा परिधान करून अनेक भाषांतून प्रतिज्ञा वाचन करण्यात आले. या कार्यक्रमांतर्गत बहुभाषिकेला व भारतीय भाषेतून शिक्षण संशोधन यांना प्रोत्साहन देण्यात आले. मुख्याध्यापिका शबाना शेख यांच्या सूचनेनुसार तसेच शिक्षक मार्गदर्शनातून हा कार्यक्रम योग्य उत्साहाने संपन्न झाला. मुख्याध्यापिकांनी विद्यार्थ्यांमध्ये भारतीय भाषा सांस्कृतिक ओळख साहित्य बद्दल सखोल ज्ञाना विषयी माहिती दिली. विद्यार्थ्यांनी योग्य माहितीने भारतीय संस्कृती परंपरा विषयी ज्ञानप्राप्ती केली.'

## स्वयंशिस्त व स्वच्छतेमुळे देश समृद्ध होतो – उपायुक्त जांभेकर


**अक्षराज : प्रभाकर हजारे**

**दि.२१, मुंबई :** विद्यार्थी दशेतूनच स्वयंशिस्त व स्वच्छता यांचे पालन केले तर आपला देश नक्कीच समृद्ध होईल. असा आशावाद बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या उपायुक्त (शिक्षण) डॉ.प्राची जांभेकर यांनी व्यक्त केला. त्या शनिवार, दिनांक २१ डिसेंबर २०२४ रोजी पवई फिल्टरपाडा येथील रस्ता सुरक्षा दल संघनायक शिबिराच्या समारोप कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत होत्या. यावेळी मंचावर बृहन्मुंबई महानगरपालिकेचे शिक्षणाधिकारी राजेश कंकाळ, उपशिक्षणाधिकारी कीर्तीवर्धन किरतकुडवे, अधिक्षक लक्ष्मण गोसावी यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना उपायुक्त डॉ. प्राची जांभेकर म्हणाल्या की, आजकाल लोकांमधली संवेदनशीलता कमी झाल्याचे जाणवत आहे. आपल्या एका चुकीच्या वर्तनामुळे इतरांना त्रास होऊ शकतो याची जाणीव लोकांकडे राहिली नाही.मनपाच्या शारीरिक शिक्षण विभागाने या निसर्गरम्य ठिकाणी आयोजित केलेल्या संघनायक शिबिरातील विद्यार्थ्यांचे कौतुक करताना अशा शिबिरातूनच विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन,स्वयंशिस्त,स्वच्छता व आपुलकी या मूलभूत मूल्यांची जाणीव निर्माण होते.ती जाणीवजागृती करण्याचे नेक काम मनपाचा शारीरिक शिक्षण विभाग करत असल्याचा सार्थ अभिमान वाटतो. असे गौरवोद्गार उपायुक्त डॉ प्राची जांभेकर यांनी व्यक्त केले. यावेळी शिक्षणाधिकारी राजेश कंकाळ यांनी या संघनायक शिबिरातील विद्यार्थी व शिक्षक यांचे कौतुक करताना शालेय आठवणीत रमत शालेय जीवनातील वर्गातल्या आठवणी कमी पण सहली व शिबिरातील आठवणी कायम मनात घर करून राहत असल्याचे सांगितले.

मुंबई महानगर हे प्रचंड गर्दीचे ठिकाण असून इथल्या रस्त्यावर चालताना वा प्रवास करताना या शिबिरातुन घेतलेल्या प्रशिक्षणाचा नक्कीच विद्यार्थ्यांना फायदा होईल. शिबिरात आलेला प्रत्येक विद्यार्थी हा मार्गदर्शक बनणार असल्याने त्यांची जिम्मेदारी आणखीनच वाढली असल्याचे शिक्षणाधिकारी राजेश कंकाळ यांनी सांगितले. तसेच ज्यांच्या आयुष्यात शिस्त असते त्यांचे आयुष्य उत्तम बनते असेही शिक्षणाधिकारी म्हणाले. प्रथम शारीरिक शिक्षण प्रशिक्षण केंद्राच्या प्राचार्या सत्यशीला कांबळे यांनी मान्यवर अतिथींचा परिचय करून दिला. तर कार्यक्रमाचे प्रास्तविक शारीरिक शिक्षण विभागाचे वरिष्ठ पर्यवेक्षक राजेश गाडगे यांनी केले. आपल्या प्रस्ताविकामध्ये राजेश गाडगे यांनी शारीरिक शिक्षण विभागाचा लेखाजोखा मांडताना वार्षिक उपक्रम व शारीरिक शिक्षण शिक्षक यांची संख्येअभावी कशी धांदल उडत आहे ते विशद केले. खात्यात आता फक्त २३७ शा शि शिक्षक कार्यरत असून लवकरात लवकर नवीन शारीरिक शिक्षण शिक्षकांची भरती करण्यात यावी अशी मागणी केली. प्रत्येक शा शि शिक्षक आपापल्या परीने १०० टक्के देण्याचा प्रयत्न करत आहे. याच कार्यक्रमात येत्या काही महिन्यात सेवानिवृत्त होणाऱ्या कनिष्ठ पर्यवेक्षकांचाही उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला. शिबिरस्थळी उत्तम कार्य केलेल्या विद्यार्थी व शिक्षकांचाही या शिबिरात सन्मान करण्यात आला. यावेळी शिबिरात आलेले आपले अनुभव दोन विद्यार्थी व शारीरिक शिक्षण शिक्षक अर्जुन बनकर यांनी व्यक्त केले. तत्पूर्वी मान्यवरांच्या उपस्थितीत शिबिरातील सहभागी सर्व संघनायक विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनीही उत्कृष्ट संचलन करत डॉ प्राची जांभेकर (उपायुक्त शिक्षण) व शिक्षणाधिकारी राजेश कंकाळ यांना मानवंदना दिली. प्रशिक्षण केंद्राच्या प्राचार्या सत्यशिला कांबळे यांच्या उत्तम नियोजनाखाली विद्यार्थ्यांनी सिग्नलची अचूक प्रात्यक्षिके करून दाखवली. बक्षीसपात्र विद्यार्थी व शिक्षकांची नावे कनिष्ठ पर्यवेक्षक किरण इंगळे यांनी वाचून दाखवली. कार्यक्रमाला माजी कनिष्ठ पर्यवेक्षक धैर्यधर पाटील, स्काऊट गाईडचे क्षेत्र संघटक धनाजी शेलवले हे उपस्थित होते. आपल्या खुमासदार शैलीत कनिष्ठ पर्यवेक्षक अनिल सनेर यांनी सूत्रसंचलन केले तर पर्यवेक्षक दत्तू लवटे यांनी मान्यवरांचे आभार मानले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी कनिष्ठ पर्यवेक्षक मधुकर माळी, विश्वनाथ गढरी, अनिल सनेर, दुर्गप्रसाद मिश्रा, सुरेश सावंत, सुरेश भोसले, ललित पाटील, रघुनाथ सोनवणे, रेणू निशाणे, रवि पाटील, सुभाष डोफे, अंकुशराव बागल, अण्णासाहेब बागल, सुभाष पाटील, किरण इंगळे, बाबासाहेब शिंदे, इत्यादींनी परिश्रम घेतले.

## इंटरनॅशनल ह्युमन राइट्स अवॉर्ड ज्येष्ठ साहित्यिक डॉ.माळवे यांना प्रदान



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२०, पुणे :** गोल्डन इरा बुक ऑफ रेकॉर्ड घ्या वतीने देण्यात येणारा यावर्षीचा गोल्डन स्टार ऑफ द इयर २०२४ आणि इंटरनॅशनल ह्युमन राइट्स अवॉर्ड सामाजिक कार्यकर्ते जेष्ठ साहित्यिक डॉ.खंडू माळवे यांना प्रदान करण्यात आला. कौशल्य विकास व उद्दमशीलता मंत्रालय, सेंट्रल व्हिजिलस्न कमिशन,रसायन एवं उर्वरक मंत्रालय, एमएसएमई उद्यम मंत्रालय, स्वास्थ आणि परिवार कल्याण मंत्रालय भारत सरकार संलग्नित संस्था गोल्डन इरा बुक ऑफ रेकॉर्ड च्या वतीने डॉ.मनिष शर्मा यांच्या हस्ते ज्येष्ठ समाजसेवक साहित्यिक, प्रबोधनकार, अध्यात्मिक, धार्मिक, क्षेत्रातील कार्यकर्ते डॉ.खंडू माळवे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले.

डॉ.खंडू माळवे (खरमा) हे महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध समाजसेवक, युनियन लिडर, राष्ट्रीय कवी असून त्यांनी सामाजिक, धार्मिक क्षेत्रात कार्य केलेले आहे. त्याचप्रमाणे व्यसनमुक्ती, महाराष्ट्र राज्य स्वच्छ अभियान, हागणदारी मुक्तगाव, खेड्यापाड्यात जाऊन आपल्या शाहिरीतून व्यसनमुक्ती कम्युनिटी हेल्थ वर्क, शैक्षणिक, सामाजिक, धार्मिक, अध्यात्मिक, नैसर्गिक आपत्ती अशा अनेक क्षेत्रात डॉ.खंडू माळवे यांनी संस्थात्मक कार्य ही केलेले आहे. महाराष्ट्र राज्य पर्यटन व कला सांस्कृतिक महोत्सव समिती–उपाध्यक्ष असल्याने अनेक संस्थामधे ते कार्यरत असून खरमा फाउंडेशन आणि विश्व कल्याण मंच अध्यक्ष या नात्याने अनेक सामाजिक शैक्षणिक साहित्यिक सेवा हिंदी मराठी भाषेतून कार्यरत आहेत. महाराष्ट्र मिडिया या कार्यक्रमात उत्तम कामगिरी केल्याबद्दल मुख्यमंत्री मित्र मिडिया ने गौरविले आहे. भारतीय हिंदी भाषा विशेष दिन पखवाडा कार्यक्रम राबवित आहे.

चाळणीवाला काव्यसंग्रहास महाराष्ट्र राज्य मराठी साहित्य व संस्कृती मंडळ २०१३ अनुदान मिळाले आहे. हिंदी व मराठी साहित्य देशभर प्रसिद्ध आहे. २००३ मधे त्यांना राष्ट्रपती पुरस्कार मिळाला आहे. त्यांना जीवन गौरव पुरस्कार तसेच गुरूब्रम्हा जीवन गौरव पुरस्कार मिळाला आहे. भारत सरकारने ५ रूपयाचे स्टॅम्प टिकिट जारी केले आहे. ह्युमन राइट्स असोसिएशन बँगलोर– दिल्ली या जागतिक संस्थेचे मेंबरशिप मिळाली आहे.

## अनधिकृत फेरीवाल्यांवर, टपऱ्यावर, बॅनर्सवर महापालिकेची तोडक कारवाई

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.२१, पनवेल :** महानगरपालिका कार्यक्षेत्रात अनधिकृतपणे रस्त्यांवर, फूटपाथवर अतिक्रमण करणाऱ्या फेरीवाल्यांवर, व्यावसायिकांवर, खाद्य व्यवसायिकांवर तसेच अनधिकृत बॅनर्स वरती आयुक्त मंगेश चितळे यांनी तोडक कारवाई तीव्र करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. त्यानूसार आज चारही प्रभागांमध्ये विविध प्रकारची कारवाई करण्यात आली.

प्रभाग समिती क कामोठे अंतर्गत फुटपाथवरती अतिक्रमण करुन अनधिकृतपणे लावण्यात आलेल्या खाद्यपदार्थाच्या स्टॉल्सवरती अतिक्रमण विभागाने कारवाई करून संबंधित ठिकाणी वापरण्यात येणारे सिलेंडर जप्त केले. तसेच वाहतूकीस अडथळा आणून रस्त्यावर अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या २ हातगाड्या तोडण्यात आल्या. याचबरोबर फूटपाथवर उभारण्यात आलेल्या अनधिकृत टपऱ्यावर जेसीबीच्या साहाय्याने तोडक कारवाई करून फूटपाथ साफ करण्यात आले. यावेळी सहाय्यक आयुक्त सुबोध ठाणेकर, अधिक्षक सदाशिव कवठे, अतिक्रमण विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

आयुक्त मंगेश चितळे यांनी दिलेल्या सूचनेनुसार उप विभाग नावडेमधील नावडे कॉलनी येथे शनिवार आठवडी बाजार बंद करण्यात आला. तसेच कामोठे येथे आठवडा बाजार भरवू दिला नाही. याचबरोबर नवीन पनवेलमधील जनार्दन भगत मार्गावरील फुटपाथवरील अनधिकृत शेडवरती तोडक कारवाई करण्यात आली. तसेच या मार्गावरील विना परवानगी लावण्यात आलेल्या बॅनर्सवरती तोडक कारवाई करण्यात आली. तसेच खांदा कॉलनीमधील फूटपाथवरील अनधिकृतपणे लावलेले बॅनर्स, दुकानांच्या नावाचे बोर्ड काढण्यात आले. तसेच फूटपाथ वरती, रस्त्यावरती अनधिकृतपणे सुरू असलेल्या खाद्यपदार्थाच्या स्टॉल्सवरती कारवाई करून सामान जप्त करण्यात आले.